असा. क्र. ३९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, ऑगस्ट १, २००६ / श्रावण १०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.—**मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. | **२७६-२७७** |

दिनांक २९ जुलै २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १ ऑगस्ट २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९४९ चा मुंबई २५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई दारुबंदी (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



[ **किंमत** : रुपये ९.०० ]

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ याच्या कलम २ मधील खंड (२८), ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई २५.

"(२८) " मळी " याचा अर्थ, गूळ किंवा साखर तयार करताना उत्पन्न झालेला व ज्यामध्ये आंबवता येण्याजोगी द्रवरूप किंवा तरंगणारी साखर आहे असा जड व काळसर रंगाचा चिकट द्रवपदार्थ असा आहे ; आणि त्या संज्ञेमध्ये, अशा द्रवपदार्थाच्या घन स्वरूपातील पदार्थाचा तसेच ज्या घटकद्रव्यामुळे अशा द्रवपदार्थाचे किंवा त्याच्या घन स्वरूपातील पदार्थाचे स्वरूप मूलतः बदलणार नाही असे कोणतेही घटकद्रव्य त्या द्रवपदार्थात किंवा त्या घन स्वरूपातील पदार्थात घालून तयार केलेल्या पदार्थाचा समावेश होतो; तसेच तीमध्ये, काळा रंगाचा गूळ म्हणून ओळखली जाणारी ऊसापासून मिळवलेली साखर आणि खांडसरी बनवल्यानंतर शिल्लक राहिलेले व तिसरी साखर किंवा रस्कट किंवा सायर म्हणून ओळखले जाणारे पदार्थ अंतर्भूत असलेल्या पदार्थांचा आणि कोणत्याही रंगाचा असलेल्या कुजक्या गुळाचा किंवा कुजक्या राबाचा देखील समावेश असेल आणि त्यामधील पुढील घटकद्रव्ये त्यांच्या निर्द्रव वजनाच्या आधारे काढलेल्या पुढील विश्लेषणात्मक प्रमाणांशी मिळत्याजुळत्या प्रमाणात असतील,—

(एक) एकूण साखर (इन्वर्ट साखर म्हणून संबोधली जाणारी साखर) ८५ टक्क्यांपेक्षा कमी आणि सुक्रोज ५७ टक्क्यांपेक्षा कमी ; किंवा

(दोन) पाण्यामध्ये न विरघळणारी अनावश्यक बाह्य वस्तू, २ टक्क्यांपेक्षा जास्त ; किंवा

(तीन) एकूण राख, ६ टक्क्यांपेक्षा जास्त ; किंवा

(चार) हायड्रोक्लोरिक आम्लामध्ये न विरघळणारी राख, ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त ; किंवा

(पाच) आर्द्रता, १० टक्क्यांपेक्षा जास्त,

परंतु राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, जो कोणताही पदार्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मळी नसल्याचे जाहीर करील त्याचा तीमध्ये समावेश असणार नाही ; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई